Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - V Issue-I JANUARY 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

# वारलींचे सामाजिक व सांस्कतिक जीवन ः परंपरा आणि परिवर्तन

प्रा.डी. के .डाके
गोपाळ कृष्ण गोखले कॉलेज
कोल्हापूर ४१६०१२

**प्रस्तावना ः**

वारलींचे सामाजिक जीवन अभ्यासतांना त्यांची विवाहसंस्था कुटुंबसंस्था कुलपध्दती व न्यायपध्दती यांचा विचार केला आहे.तसेच त्यांच्या सांस्कृतिक जीवनातील नृत्ये लोकगीते सणवार उत्सव व वारली रंगचित्रे यांचा अभ्यास केला आहे.त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनात कोणते बदल झालेले आहेत याचाही परामर्श घेतला आहे.

**वारल्यांची विवाहसंस्था ः**

बहुतेक आदिवासीप,माणे वारली लोकांतही स्त्री व पुरूष याच्यांत मोकळेपणाचे संबंध आहेत.त्यांच्यात प,ौढ विवाह होतात.वारली लोकात हिंदू लोकांप,माणे मामेबहिणीचे आतेभावाशी लग्न होऊ शकते.मात्र चुलत अथवा मावस भावंडे यांचे व एकाच कुळातील स्त्री पुरूषांचे विवाह संबंध प,स्थापित होत नाहीत.विवाहाच्या पुढील पध्दती वारली लोकात रूढ आहेत.

१. वर व वधु ः यांच्यात प्रथम विचार होऊन उभयपश्राच्या संमतीने देणी घेणी ठरतात.ही पध्दत सर्वाधिक रूढ असून बहुतेक विवाह याच पध्दतीने होतात.
२. घर जावई विवाह पध्दत.ः वारली मध्ये ही पध्दत पुष्कळ प्रमाणात आढळून येते.एखादया मनुष्याला मुलगा नसेल घरी मोठया मुलीच असतील तर एका मुलीसाठी वर म्हणून आणलेल्या पुरूषाला बाप घरी ठेवून घेतो.सासरयाला शेतीच्या कामात मदत करणे ही घर जावयाची प्रमुख भूमिका असते.मुलाची आर्थिकस्थिती गरिबीची असेल तर पुष्कळ मुले घरजावई म्हणून राहण्यास तयार होतात.अशा जावयाला घरोरी किंवा खंदाडया असे म्हणतात.
३. कोरडयावरचे लग्न ःलग्नासाठी करावा लागणारा खर्च देण्याची ऐपत नसलेल्या पुरूषांसाठी ही पध्दत रूढ झाली आहे.लग्नाचा सर्व खर्च एकदम न करता या पध्दतीत वर आपल्या वधूला तिच्या बापाला थोडी रक्कम देऊन घरी घेऊन येतो व संसार सुरू करतो.

अशा पध्दतीने आणलेल्या वधुला कोरडयावर आणली असे म्हणतात,दुसरया एखादया लग्नात घरोब्याप्रमाणेच याचेही लग्न उरकण्यात येते.

**वारल्यांची कुटुंबसंस्था ः**

वारली समाजात पितृप,धान समाजरचना रूढ आहे.त्यामुळे पुरूष हाच कुटंबातील प,मुख समजला जातो.कुटुंबाला हे लोक कुल म्हणतात म्हणून आडनावाला कुळी म्हणतात.वारसाची पध्दतीही पुरुषप,धान आहे.पित्याच्या मृत्यूनंतर त्याची सर्व मालमत्ता मुलाला मिळते.मुलीला यात हिस्सा नसतो.वारली लोकांच्या कुटुंबपध्दतीचा दुसरा विशेष असा की त्यांच्या समाजपध्दतीत एकत्र कुटुंबे कोढेच आढळत नाहीत.लग्न झाले की मुलगा बापापासून किंवा भाऊ भावा पासून वेगळा राहतो.या मुळे आई वडीलांचे हाल होतात.

वारली कुटुंबात पिता हा सर्वाधिकारी असतो.लहान मुलांना कुटुंबात महत्वाचे स्थान असते.वारली कुटुंब पितृनामी आहे.म्हणजे स्त्री आपल्या नवरयाचे नाव धारण करते व मुले पित्याचे नाव थारण करतात.स्त्रीला स्वतःच्या नावाने

ओळखत नाहीत.अमक्या तमक्याची पत्नी असे तिला ओळखतात.वारली जमातीत पितृवंशीय परंपरा असते.परंतु पूर्णपणे पितृस्थानीयता मात्र असत नाही.योग्य वाटले तर मनुष्य आपल्या सासरयाच्या खेडयावर जाऊन वस्ती करून राहतो.

हिंदू कुटुंबाप,माणे पारंपारिक चालीरीती वारली कुटुंबात आढळत नाहीत.उदा.कोणत्याही सदस्याला आदरपूर्वक हाक मारली जात नाही.पती व पत्नी यांचे परस्परांशी वागणे अगदी मोकळेपणाचे असते.

वारल्यांची कुलपध्दतीः वारल्यांच्या कुळाला कुल किंवा वरगणी असे म्हणतात.प्रत्येक कुल म्हणजे जमातीचा बहिर्विवाही भाग असतो.प,त्येक कुलाला वेगळे आडनाव असते.जमाती मध्ये अशी अनेक कुळे सामावलेली असतात.प्रत्येक कुलाचा पूर्वज वेगळा असतो अशी वारल्याची समजूत आहे.पूर्वजाचे नक्की नाव मात्र कोणालाच माहिती नसते.वारल्यांमध्ये दोनशे कुळे आहेत.

**वारल्यांमधील नातेसंबधांच्या रूढी ः**

इतर आदिवासींप,माणेच वारली लोकात नातेसंबंधाच्या काही रूढी आढळून येतात.उदा.सविशेषाधिकार परिचित.काही नातेवाईकांना परस्परांशी वागतांना वागणुकीचे स्वातंत्र्य घेता येते.याला सविशेषाधिकार परिचितता असे म्हणतात.वारल्यामध्ये मामा व भाचा यामधिल नाते हे या प्रकारचे असते.भाच्याशी वागताना मामा नेहमी मोकळेपणाने वागतो.

**वारल्याची न्यायपध्दती ः**

वारली व्यक्ती समाजाच्या विरूध्द जाऊ शकत नाही.एखादया व्यक्तीने पंचांचा निर्णय टाळला तर ती व्यक्ती बहिष्कृत होते.यामुळे जमातीचे न्यायालय सांगेल ती शिक्षा मानणे व्यक्तीला भागच असते.

जमातीच्या न्यायालया बरोबर न्यायदान करणारी आणखी  एक संस्था वारली जमातीत आहे.तिला पटेल किंवा जातेला असे म्हणतात.जातेला किंवा पटेल हा जमातीतील न्यायाधीश असतो,.जातेला फक्त न्याय देतो असे नव्हे तर दिलेल्या न्यायाची अंमलबजावणीसुध्दा करतो.जातेल्याचा हुदा वंशपरंपरागत असतो.म्हणजे हा हुददा बापानंतर मुलाकडे जातो.

न्यायदानाच्या कामासाठी कारभाराच्या सोईसाठी चार किंवा पाच खेडयांचा एक समुह तयार केला जातो.खेडयातील सामाजिक तंटे बखेडे पंचाकडून मिटविले जातात.ज्या गुन्हयामुळे सर्व जमातीचे हितसंबंध धोक्यात येण्याची शक्यता असते अशा गुन्हयांच्या निकालासाठीच जमातीचे न्यायालय बोलाविले जाते.विवाहसंबंधातील कुरबुरी घटस्फोट विवाहबाहय संबंध मुलगी पळवून नेणे इ.स्वरूपाचे गुन्हे जमातीच्या न्यायालयापुढे आणले जातात.

**सांस्कृतिक जीवन ः**

वारल्यांच्या सांस्कृतिक क्षेत्रात वारल्यांची रंगचित्रे व नृत्यप,कार नृत्यशैली सर्वश्रुतच आहेत.वारल्यांच्या रंगचित्रांनी देशाची सीमा ओलांडून परदेशी प्रयाण केले आहे.रंगचित्रातील चित्रांची शैली रंगाचे प्रकार व रंगाचे महत्व व रंग तयार करणे या गोष्टी परदेशी जाऊन पोहचल्या आहेत.वारली रंगचित्रांना परदेशी बरीच मागणी आहे.तसेच देशातील इतर राज्यांकडूनही मागणी आहे.त्यामुळे वारली समाज हा कलेने समृध्द स्वतंत्र व स्वयंभू आहे.

वारल्यांच्या नृत्यप,कारात तारपे नृत्य सुप,सिध्द आहे.तारपे या त्यांच्यां वादयावर स्त्री पुरूष नृत्य करतात.ढोल तारपे वेळू टिमकी सारखे वादयांचा उपयोग ते नृत्य व संगीताचा कार्यक,म करताना करतात.

**संदर्भग्रथ सूचीः**

1. K.J.Save : The Warlis
2. T.B.Naik : Applied Anthropology In India a Trade Report
३.आदिवासी संशोधन पत्रिका ः सप्टेंबर १९९२, सप्टेंबर १९९६ सप्टेंबर २००१.

४.हाकारा ः जानेवारी जून १९९० जानेवारी मार्च १९९६ जानेवारी मार्च १९९९ जानेवारी जून २००१.
५.संगवे विलास ः आदिवासींचे सामाजिक जीवन
६.डॉ.गोरे गोविंद ःभारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती.
७.नाडगौंडे गुरूनाथ ःभारतीय आदिवासी कॉन्टिनेन्टल प,काशन पुणे.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com